




दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!









संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३३५ वा | शनिवार दि ०४ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# राघव चड्डांना आपमधूनच धक्का,राज्यसभेच्या उपनेतेपदावरुन हटवलं, पक्षात फूट पडल्याच्या चर्चांना उधाण



**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्डा यांना पक्षानेच धक्का दिला आहे. राज्यसभेवरील आपच्या उपनेतेपदावरुन चड्डांना हटवण्यात आले आहे. त्यांच्या जागेवर पंजाबचे खासदार अशोक मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चड्डा हे २०२३ पासून राज्यसभेवर आपचे उपनेतेपद भूषवत होते. अचानक झालेला निर्णय चड्डांसाठी धक्का मानला जात असून पक्षात फ ूट पडल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. फेरबदलाबाबत राज्यसभा सचिवालयाला आम आदमी पक्षाकडून औपचारिक पत्र पाठवण्यात आले आहे. चड्डा यांना संसदेत बोलण्यासाठी वेळ देऊ नये, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे. आप आणि पक्षाच्या शीर्ष नेतृत्वाशी संबंधित महत्त्वाच्या घडामोडींवर राघव चड्डा यांनी मौन बाळगल्यामुळे पक्षात फूट पडल्याच्या चर्चांना उधाण आले होते, अशा वेळी पक्षाकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे. फेब्रुवारीमध्ये दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात न्यायालयाने आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि इतरांना सर्व आरोपांतून निर्दोष ठरवल्यानंतर राघव चड्डा यांनी सार्वजनिकरित्या कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती. तसेच आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना मिळालेल्या या दिलाशाबद्दल त्यांनी सोशल मीडियावरही कोणतीच पोस्ट केली नाही, त्यामुळे राजकीय वर्तुळात कुजबूज सुरु झाली होती पक्षाच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांनाही राघव चड्डा अनुपस्थित होते. केजरीवाल यांनी पक्ष कार्यालयात घेतलेली पत्रकार परिषद असो किंवा जंतर मंतर येथील जनसभा, सत्ताधारी भाजपवर आम आदमी पक्ष जोरदार हल्ला चढवताना चड्डांची अनुपस्थिति लक्षणीय ठरली.

व्यवसायाने सीए असलेले ३७ वर्षीय राघव चड्डा हे २०१२ मधील आम आदमी पक्षाच्या सुरुवातीपासूनच सोबत आहेत. ते केजरीवाल यांचे निकटवर्ती मानले जात. ते आपचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष असून, राज्यसभेतील सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था असलेल्या राजकीय व्यवहार समितीचे सदस्य आहेत. इंडिया आघाडीच्या समन्वयात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दिल्लीची आमदारकी भूषवल्यानंतर पक्षाने त्यांना राज्यसभेवर संधी दिली. त्यामुळे वरिष्ठ सभागृहातील सर्वात तरुण सदस्यांपैकी एक ठरण्याचा मान त्यांना मिळाला. राघव चड्डा यांनी दिल्ली जल बोर्डाचे उपाध्यक्ष म्हणून काम केलं आहे.

तसंच पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांचे सल्लागार म्हणूनही काम पाहिलं आहे. सध्या चड्डा यांच्याकडे पक्षाचे पंजाब सह-प्रभारी म्हणून जबाबदारी आहे. पक्षाच्या कामकाजापासून अलिप्त राहिल्याबद्दल चड्डांवर टीका होण्याची ही पहिली वेळ नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी मद्य घोटाळा प्रकरणात केजरीवाल यांना अटक झाली तेव्हा, यूकेमध्ये डोळ्यांच्या शस्त्रक्रियेतून बरे होत असल्याचे कारण देत चड्डांनी उशिरा प्रतिक्रिया दिली होती.

# आई रेणुका मातेच्या वहन मिरवणुकीवर महायुतीतर्फे पुष्पवृष्टी....


## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणी आ. श्वेताताई महाले यांची प्रमुख उपस्थिती...

**जनसंचलन/चिखली**

आई रेणुका मातेच्या पवित्र यात्रा महोत्सवानिमित्त चिखली नगरी आज भक्तीभावाने न्हाऊन निघाली. चिखली शहरातून मार्गस्थ झालेल्या वहन मिरवणुकीचे खामगाव चौफुली येथे चिखली विधानसभेच्या आमदार श्वेता महाले पाटील यांच्या नेतृत्वात चिखली शहर महायुतीच्या वतीने पुष्पवृष्टी करून भाविकांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. केंद्रीय आयुष व आरोग्य राज्यमंत्री मा. प्रतापराव जाधव साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अधिकच भव्य ठरला. पुष्पवृष्टीच्या त्या पवित्र क्षणी वातावरणात श्रद्धा, भक्ती आणि आनंद यांचा अपूर्व संगम अनुभवायला मिळाला. प्रत्येक भाविकाच्या चेहऱ्यावर समाधान आणि आई रेणुका मातेच्या कृपेची झलक स्पष्टपणे दिसत होती. आमदार सौं.श्वेता महाले पाटील यांनी आई रेणुका मातेच्या चरणी नतमस्तक होऊन सर्व भाविकांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी नांदो, अशी प्रार्थना केली. यावेळी विद्याधर महाले (मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव), नगराध्यक्ष पंडितदादा देशमुख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख शिवाजीराव देशमुख, युवा सेना जिल्हा प्रमुख ऋषी जाधव, शहर प्रमुख विलास घोलप, भाजप शहराध्यक्ष सागर पुरोहित, कपिल खेडेकर, राहुल सवडतकर, भास्कर राऊत, बळीराम काळे, मायाताई म्हस्के (जिल्हा प्रमुख, शिवसेना महिला आघाडी), कैलास भालेकर, श्रीकांत टेहरे, राजेश पवार, अमोल ढोरे पाटील यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दिएगो गार्सियाचे स्थानमहात्म्य



दिएगो गार्सिया ( ७.३० अंश दक्षिण अक्षांश / ७२. ४४ अंशअतिशय पूर्व रेखांश ) हे हिंदी महासागरातील बेट इस्रायल, अमेरिका आणि इराण संघर्षादरम्यान आता एक महत्त्वपूर्ण ठिकाण बनले आहे. दिएगो गार्सिया हे ३२. ५ चौरस किमी क्षेत्रफळ असलेले एक लहान प्रवाळ बेट आहे. परंतु जागतिक सुरक्षा आणि भू-राजकारणामध्ये त्याची भूमिका अत्यंत मोठी आहे. हे बेट अमेरिकेच्या महत्त्वाच्या सामरिक लष्करी तळांपैकी एक आहे. बेटाच्या भौगोलिक स्थानामुळे हिंदी महासागर, पश्चिम आशिया आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्राच्या सर्व भागांतून इथे वेगाने लष्करी हालचाली करणे शक्य होते. आपल्या भौगोलिक स्थानामुळे, या बेटाला पाळत ठेवण्याची अतुलनीय क्षमता, नौदल वर्चस्व आणि रसद पुरवठ्याची जबरदस्त ताकद मिळाली आहे. जागतिक महासत्तांमध्ये जसजसा संघर्ष वाढत जातो, तसतसे दिएगो गार्सियाचे महत्त्व वाढत जाते. २१ मार्च २०२६ रोजी, इराणने दिएगो गार्सियावर दोन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यामुळे संपूर्ण जग हादरून गेले. या घटनेने इराणची वाढती क्षेपणास्त्र क्षमता अधोरेखित केली. ही क्षेपणास्त्रे लष्करी तळावर आदळली नाहीत, मात्र या घटनेने दिएगो गार्सियाचे महत्त्व इतके का आहे, हे पुन्हा सिद्ध केले. दिएगो गार्सिया हे मध्य हिंदी महासागरात, मालदीवच्या दक्षिणेकडील टोकाशी असलेल्या अडू सिटी पासून सुमारे ७३३ किलोमीटर अंतरावर स्थित असलेले एक दुर्गम आणि घोड्याच्या नालेच्या आकाराचे प्रवाळ बेट आहे. हे ङ्गचागोस द्वीपसमूहातील मोठे बेट असून, ते ङ्गब्रिटिश इंडियन ओशन टेरिटरीफ्चा एक भाग आहे. एका उथळ आणि खाऱ्या पाण्याच्या १० मीटर खोल असलेल्या सरोवराला वेढून टाकणारे हे बेट, हिंदी महासागराच्या मध्यभागी स्थित एक धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा लष्करी तळ म्हणून कार्य करते. दिएगो गार्सिया हे मध्य हिंदी महासागरातील एक प्रवाळ बेट आहे. हे बेट विषुववृत्ताच्या दक्षिणेस केवळ ८०० किमी अंतरावर स्थित आहे. छागोस द्वीपसमूहातील हे सर्वात मोठे बेट आहे. हे बेट मालदीवच्या दक्षिणेस स्थित आहे. हे बेट भारताच्या दक्षिण टोकापासून १,७९६ किमी नैऋत्येस वसलेले आहे. ते टांझानियाच्या पूर्वेस ३,५३५ किमी अंतरावर स्थित आहे. या बेटाचा आकार इंग्रजी ङ्गव्हीफ किंवा घोड्याच्या नालेसारखा आहे. दिएगो गार्सियाचे खाऱ्या पाण्याचे सरोवर, लॅगून , आकाराने मोठे असून ते जवळपास पूर्णपणे प्रवाळ खडकांनी वेढलेले आहे. हे अटोल ङ्गछागोस लखदीवफ पर्वतरांगेचा एक भाग आहे. ही एक पाण्याखालील पर्वतरांग आहे. या रांगेमध्ये लक्षद्वीप, मालदीव आणि छागोस बेटे यांचा समावेश होतो. जवळच असलेला ङ्गछागोस बँकफ हा जगातील सर्वांत मोठा प्रवाळ अटोल संरचना असलेला भाग आहे. छागोस बेटांच्या समूहामध्ये हिंदी महासागरातील काही सर्वोत्तम प्रवाळ-भित्ती परिसंस्था आढळतात. दिएगो गार्सिया बेटाचा शोध सर्वप्रथम १६ व्या शतकात युरोपीय सत्तांनी लावला आणि त्यानंतर हे बेट ब्रिटिश-नियंत्रित छागोस द्वीपसमूहाचा भाग बनले. १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला, युनायटेड किंगडम आणि अमेरिका यांची संयुक्त लष्करी छावणी उभारण्यासाठी मूळ रहिवासी असलेल्या छागोसियन जनतेचे विस्थापन करण्यात आले. तेव्हापासून, हे बेट हिंदी महासागरातील सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठाणे बनले आहे. दिएगो गार्सियाचा शोध १५१२ मध्ये पोर्तुगीज खलाशांनी लावला. १५४४ मधल्या दुसऱ्या एका मोहिमेत, दिएगो गार्सिया दे मोगुएर नावाचा एक स्पॅनिश संशोधक सहभागी होता. या बेटाचे नाव त्याच्या नावावरूनच ठेवले गेले असावे, असे मानले जाते. शोध लागल्यानंतर सुमारे २०० वर्षे हे बेट मानवी वस्तीविरहित राहिले. दिएगो गार्सिया असे नाव दर्शवणारा पहिला नकाशा एडवर्ड राईट यांनी तयार केला आणि तो १५९९ मध्ये प्रकाशित करण्यात आला. १७८० च्या दशकात फ्रेंचांनी या बेटावर आपली वसाहत स्थापन केली. त्यांनी आफ्रिका आणि भारतातून गुलाम म्हणून कामगारांना येथे आणले. या कामगारांनी येथे नारळाच्या समृद्ध बागा (मळे) विकसित केल्या. १८१४ मध्ये, पॅरिसच्या तहानुसार या बेटाचे स्वामित्व फ्रान्सकडून ब्रिटनकडे हस्तांतरित झाले. त्यानंतर, ब्रिटिश अधिपत्याखालील ङ्गमॉरिशस वसाहतीफ्चा एक भाग म्हणून ते ओळखले जाऊ लागले. १९६५ मध्ये, ब्रिटनने छागोस द्वीपसमूह मॉरिशसपासून वेगळा केला.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'आखातातल्या सगळ्या अमेरिकी कंपन्या जमीनदोस्त करु'

## पॉवर प्लांट उडवण्याच्या ट्रम्प यांच्या धमकीवर इराणचं प्रत्युत्तर..

**मुंबई/वृत्तसंस्था :** अमेरिका-इराण युद्ध अद्यापही सुरू आहे. या युद्धाचा अनेक देशांवर मोठा परिणाम होत आहे. मात्र, तरीही युद्ध थांबण्याची चिन्ह दिसत नाहीत. अमेरिका-इराण युद्ध कधी थांबणार? की हे युद्ध आणखी भडकणार? याबाबत आता संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे. कारण एकीकडे युद्धविरामाच्या प्रस्तावावर चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज वेगवेगळे वक्तव्य करून इराणला धमकीवजा इशारा देत आहेत.

यातच आज अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानला पश्चिमेकडील करज शहराशी जोडणाऱ्या एका महामार्गावरील एका मोठ्या पुलावर भीषण हल्ला केला. या हल्ल्याचा व्हिडीओही ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडियावरून शेअर केला आहे. तसेच याआधी अमेरिकेने इराणमधील पॉवर प्लांट उडवण्याची धमकीही





दिली होती. अमेरिकेच्या या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आणि ट्रम्प यांच्या धमकीनंतर आता इराणने अमेरिकेला मोठा इशारा दिला आहे. 'आखातातल्या सगळ्या अमेरिकी कंपन्या जमीनदोस्त करू', असा इशारा इराणी सैन्यांनी अमेरिकेला दिला.

अमेरिका आणि इस्रायलने पुन्हा एकदा संयुक्त हल्ला करत पश्चिम आशियातील सर्वात उंच पुलांपैकी एक असलेल्या इराणमधील कराज येथील एक पूल उद्ध्वस्त केला आहे. त्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत इराणला पुन्हा एकदा मोठा इशारा दिला. "खूप उशीर होण्यापूर्वी इराणने करार करावा. इराण अजूनही एक महान राष्ट्र बनू शकतं. पण काहीही शिल्लक न राहण्याआधी आता करार करण्याची वेळ आली आहे", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं.

इराणची राजधानी तेहरानला पश्चिमेकडील करज शहराशी जोडणाऱ्या महामार्गावरील एका मोठ्या पुलावर अमेरिकेने भीषण हल्ला केला. या हल्ल्यात दोन जण ठार झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडियावर या हल्ल्याचा व्हिडीओ शेअर केला असून या व्हिडीओमध्ये त्या पुलाचं मोठं नुकसान झाल्याचं दिसत आहे.

**इराणी सैन्यांनी काय इशारा दिला?** "आखातातील सर्व आयसीटी (ICT) कंपन्या अजूनही लक्ष्य आहेत. जर अमेरिकेने इराणच्या वीज प्रकल्पांसंबंधीच्या धमक्यांची अंमलबजावणी केली, तर आम्ही देखील प्रत्युत्तर देऊ. यामध्ये झिओनिस्ट राजवटचे सर्व वीज प्रकल्प, ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि माहिती व दळणवळण तंत्रज्ञान, तसेच या आखातातल्या अमेरिकन भागधारक असलेल्या सर्व कंपन्यांचा संपूर्ण नायनाट केला जाईल. आमच्या नजरेपासून काहीही लपलेलं नाही", असा इशारा इराणच्या खतम अल-अंबिया मुख्यालयाच्या प्रवक्त्याने एका व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून दिला.

# भरती प्रक्रिया जलदगतीने घेण्याबाबत मोठा निर्णय; सोमवारी महत्त्वाची बैठक



**नागपूर/वृत्तसंस्था :** महाराष्ट्रात २०२६ मध्ये ७०,००० हून अधिक सरकारी पदांची मेगा भरती होणार असून, यामध्ये पोलीस, तलाठी, आणि शिक्षकांसह इतर अनेक विभागांतील रिक्त पदे भरली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भरती प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले असून, २०,००० पदे एमपीएससीद्वारे भरली जातील. मात्र भरती प्रक्रिया राबवण्यास अनेकदा अडचणी येतात तसेच राज्य सरकारच्या विविध विभागाकडून मागणी पत्र देण्यामध्येही प्रचंड विलंब होतो. त्यामुळे राज्य सरकारने एमपीएससीची भरती प्रक्रिया जलद गतीने घेण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतलेला आहे.

सातत्याने रखडत चाललेले निकाल, परीक्षा, निवड प्रक्रिया आणि आरक्षणाच्या गोंधळामुळे राज्यातील स्पर्धा परीक्षार्थी चिंताग्रस्त झाला आहे. मात्र, आयोगाने यावर उपाय शोधला आहे. सरकारने तीन सदस्यांची नियुक्ती केली असून यामुळे एमपीएससी बळकट होणार आहे. तसेच निकाल आणि नियुक्तीच्या प्रक्रियेला गती येण्याची शक्यता व्यक्त केली जाते. राजीव निवतकर, दिलीप भुजबळ आणि महेंद्र वारभुवन यांची नियुक्ती केली होती.एमपीएससीच्या माध्यमातून राज्यसेवेत अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांना न्याय देण्यासाठी 'एमपीएससी'च्या तीन रिक्त सदस्यपदांवरील नियुक्ती तातडीने करण्यात यावी, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून करण्यात आली होती.

### बैठकीचा मुख्य विषय काय?

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यसेवा परीक्षांसाठी मागणीपत्र पाठविण्याबाबत कार्यवाही प्रशासकीय विभागांमार्फत केली जाते. तथापि विभागांमध्ये रिक्त असलेल्या पदांसाठीचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे विहित मुदतीत सादर न केल्यामुळे सदर पदांसाठी निवडप्रकीया राबविण्याबाबतची पुढील कार्यवाही दीर्घकाळ प्रलंबित राहाते. सबब, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठविण्यात येणाऱ्या मागणीपत्रांची प्रक्रिया जलदगतीने होण्याच्या अनुषंगाने रिक्त पदांचा आढावा घेण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०४.२०२६ रोजी दु.२.३० वाजता मा. मुख्य सचिव यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली आहे.

# सातारा जिल्हा परिषद सभापती निवडीसाठी आज सभा

**सातारा/वृत्तसंस्था :** सातारा जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण, महिला व बालकल्याण तसेच इतर दोन विषय समित्यांच्या सभापती पदासाठी ४ एप्रिल २०२६ रोजी दुसरी विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी जिल्हा परिषद इमारतीच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या घटक पक्षाने सावध भूमिका घेत आपली रणनीती स्पष्ट केली आहे. सभापतीपदी महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना यापैकी कुठल्या पक्षांचे सभापती होणार याविषयी मोठी उत्सुकता आहे.

सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीनंतर सभापती पदाच्या निवडी शनिवार (दि. ४) रोजी सातारा जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये होत आहेत. मागील राजकीय गोंधळाचा अनुभव लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक आदेश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी जाहीर केले आहेत. हे आदेश शनिवारी सकाळी सात वाजल्यापासून सभा संपेपर्यंत लागू राहणार आहेत. आदेशानुसार, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य, शासकीय अधिकारी-कर्मचारी आणि बंदोबस्तावर नियुक्त पोलीस अधिकारी यांच्याशिवाय इतर कोणालाही या परिसरात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. भाजपाच्या नेत्यांनी आपल्या




सदस्यांना महाबळेश्वर येथे विशिष्ट ठिकाणी बैठकीच्या निमित्ताने बोलावून सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. काही पदाधिकाऱ्यांचा अपवाद वगळता बहुतांश जिल्हा परिषद सदस्य महाबळेश्वर येथे असल्याची माहिती मिळत आहे. भारतीय जनता पार्टीचेच सभापती होतील, असा दावा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केला आहे. मात्र, प्रदेश कार्यकारिणीच्या सूचनेनंतर महायुतीतील मोठा भाऊ असणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या साताऱ्यातील नेत्यांनी पुन्हा दोस्तीचा सूर अळवला आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे सर्व थकीत मानधन अदा..!

**मुंबई/वृत्तसंस्था :** राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यासाठी दिलासादायक निर्णय घेत, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सर्व थकीत मानधन यशस्वीरित्या अदा करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यात एकूण 1,10,664 अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. त्याअंतर्गत सुमारे 1,09,659 अंगणवाडी सेविका आणि 1,06,742 अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांचे मानधन केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे 60 टक्के व 40 टक्के हिस्स्यातून दिले जाते, तसेच अतिरिक्त राज्य हिस्सा देखील नियमितपणे अदा केला जातो. यानुसार राज्य शासनाचा हिस्सा अदा करण्यात आला होता. केंद्र शासनाने विकसित केलेली 'एसएनए स्पर्श' (SNA SPARSH) ही अत्याधुनिक डिजिटल प्रणाली आता या प्रक्रियेत यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात



आली आहे. या प्रणालीमुळे निधी वितरण अधिक पारदर्शक, अचूक आणि कार्यक्षम पद्धतीने होणार असून, थेट लाभार्थ्यांच्या खात्यात निधी पोहोचण्यास गती मिळणार आहे. केंद्र व राज्य हिश्याच्या मानधनासाठी 'एसएनए स्पर्श' (SNA SPARSH) प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. या प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करणे आणि केंद्र शासनाची मंजुरी मिळवणे आवश्यक होते. मात्र, या कालावधीत अतिरिक्त राज्य हिश्याचे मानधन नियमितपणे वेळेत वितरित करण्यात आले होते. आता सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाली असून, SNA SPARSH प्रणाली यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे थकबाकी देयके अदा करण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर काही माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या अपूर्ण किंवा दिशाभूल करणाऱ्या बातम्यांमध्ये तथ्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेअर मार्केटमध्ये पैसा लावा, चिक्कार रक्कम मिळवून देतो', 2.93 कोटी लाटले, पुण्यात सायबर रॅकेटचा पर्दाफाश

**चिंचवड :** पिंपरी-चिंचवडमध्ये IPO गुंतवणुकीच्या नावाखाली मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत तब्बल 2 कोटी 93 लाख रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आंतरराज्यीय आणि आंतरराष्ट्रीय कनेक्शन असलेल्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. तक्रारदाराला शेअर मार्केटमधील IPO मध्ये गुंतवणूक केल्यास अल्पावधीत प्रचंड नफा मिळेल, असे आमिष आरोपींनी दाखवले. विश्वास संपादन करण्यासाठी सुरुवातीला काही व्यवहार दाखवण्यात आले. त्यानंतर हळूहळू मोठ्या रकमा गुंतवायला भाग पाडत तब्बल 2 कोटी 93 लाख रुपये उकळण्यात आले.मात्र, गुंतवणुकीवर कोणताही परतावा न मिळाल्याने आणि आरोपी संपर्काबाहेर गेल्याने तक्रारदाराला फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तात्काळ पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तपासादरम्यान आरोपींनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया येथील खात्यात 1 लाख 25 हजार रुपये ट्रान्सफर करून घेतल्याचे समोर आले. हे खाते अरशील इंडस्ट्रीज



प्रायव्हेट लिमिटेड या नावाने उघडण्यात आले होते.सायबर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे नवी मुंबई गाठली आणि तुर्भे पोलिसांच्या मदतीने सुशील भगवान जुवाटकर याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने संबंधित बँक खाते आपल्या साथीदार पंकज राज कपूर आणि निश्चल टंकबीर बरेयली यांनी वापरल्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी दोघांनाही अटक केली. तपासात उघड झाले की, पंकज राज कपूर आणि निश्चल टंकबीर बरेयली हे यापूर्वी बँकॉक आणि म्यानमार येथे सायबर फसवणुकीसाठी चालवल्या जाणाऱ्या कॉल सेंटरमध्ये काम करत होते. ते भारतात परतल्यानंतर नवी मुंबईत अशाच प्रकारचे कॉल सेंटर सुरू करण्याच्या तयारीत होते.या टोळीची कार्यपद्धती अत्यंत सुनियोजित होती. बनावट कंपन्यांच्या नावाने बँक खाती उघडणे, विविध बँकांचे अकाउंट ओपनिंग किट तयार ठेवणे, QR कोड आणि POS मशीनचा वापर करून पैसे गोळा करणे, तसेच वेगवेगळ्या ओळखी वापरणे, अशा पद्धतीने ते नागरिकांची फसवणूक करत होते. पोलिसांनी आरोपींकडून 6 मोबाईल फोन, 3 पासपोर्ट, 3 POS मशीन, 2 लॅपटॉप, 2 हार्डडिस्क, 2 QR कोड स्कॅनर, 12 बनावट शिक्के, 24 वेगवेगळ्या बँकांचे अकाउंट ओपनिंग किट आणि 5 डेबिट कार्ड असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे मोठ्या सायबर फसवणूक रॅकेटचा भांडाफोड झाला असून, आणखी किती लोकांची फसवणूक झाली आहे याचा तपास सुरू आहे. पिंपरी-चिंचवड सायबर पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

## आईच्या ऑपरेशनसाठी जमा केलेली रक्कम मिळाल्याने महिला भावुक

**छत्रपती संभाजीनगर :** आईच्या ऑपरेशनसाठी दोन बहिणींनी मिळून पैशांची जुळवाजुळव केली. एका बहिणीने रोख रक्कम दिली तर दुसऱ्या बहीणीकडे रोख रक्कम नसल्याने सुमारे एक तोळे सोने दिले. पण हॉस्पिटलमध्ये जात असतानाच घाईगडबडीत रोख रक्कम आणि सोने ज्या बॅगेत ठेवले होते ती बॅगच रिक्षात राहिली. या प्रकारामुळे त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. मात्र जवाहरनगर पोलिसांनी अवघ्या दोन तासांत शर्थीचे प्रयत्न करून दीड लाखांचा ऐवज शोधून काढला. बॅग परत मिळताच संबंधित महिलेच्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

पोलिसांच्या रुपात देव भेटले, अशी भावना त्या महिलेने व्यक्त करत आभार मानलेय.पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, बॅग हरविल्याची घटना २ एप्रिल रोजी सकाळी सुमारे साडेअकरा वाजता आकाशवाणी चौक परिसरात घटना घडली. मिनाक्षी देवीदास गायकवाड (वय २५, रा. वाघोळा, ता. फुलंब्री) या त्यांच्या आई शशिकला बोडखे (वय ५५) यांच्या उपचारासाठी शहरात आल्या होत्या. ऑपरेशनसाठी मिनाक्षी आणि त्यांची बहिण सुवर्णा वनारसे यांनी पैशांची जुळवाजुव केली. यात मिनाक्षी यांनी रोख रक्कम आणि बहिण सुवर्णा यांनी सुमारे एक तोळ्याचे सोन्याचे दागिने दिले होते. हॉस्पिटलमध्ये जाताना सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण सुमारे १ लाख ५० हजारांचा ऐवज तसेच कागदपत्रे त्यांनी बॅगमध्ये ठेवला होते. मिनाक्षी ह्या आईसोबत हर्सुल टी पॉइंट येथून रिक्षाने आकाशवाणी चौक येथील एका हॉस्पिटलला आल्या.

हॉस्पिटलच्या तणावात आणि घाईगडबडीत त्यांच्याकडील बॅग रिक्षातच राहून गेली. काही वेळानंतर बॅग रिक्षात विसरल्याचे लक्षात येताच त्यांनी रिक्षाचा शोध घेतला. मात्र यश न मिळाल्याने ते हतबल झाले. बॅग परत मिळेल, याची आशा त्यांनी जवळपास सोडूनच दिली होती. अखेर त्यांनी जवाहरनगर पोलिसांकडे धाव घेतली.पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ शोध मोहीम सुरू केली. पोलिस अंमलदार मारोती गोरे यांनी ५० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासत रिक्षाचा माग काढला. रिक्षाचालक रामेश्वर राजपूत (रा. हसूल) यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांच्या रिक्षामध्येच बॅग सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले.

## 28 वर्षांच्या स्नेहल अहिनवे यांचा दुर्दैवी मृत्यू

**पुणे :** ओतूर परिसरातील मोनिका चौकात शुक्रवारी सकाळी काळजाचा थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला. भरधाव ट्रक आणि स्कुटीमध्ये झालेल्या जोरदार धडकेत २८ वर्षीय स्नेहल रवींद्र अहिनवे या तरुण महिलेचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. अपघाताचा अंगावर शहारे आणणारा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला असून, यात दुर्दैवाने ट्रकचे चाक स्नेहल यांच्या डोक्यावरून गेल्याचे दिसत आहे. या दुर्घटनेमुळे तिला मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला आणि गंभीर दुखापत झाली. या घटनेमुळे ओतूर परिसरात मोठी खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत तिला जवळच्या खासगी रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तात्काळ तपासणी केल्यानंतर तिला मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे स्नेहलच्या कुटुंबावर शोककळा पसरली असून, ओतूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी अपघाताची नोंद घेत तपास सुरू केला आहे. ट्रकचालकावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात आहेत. अपघाताचे कारण, जबाबदारी आणि नियमभंग यांचा शोध सुरू आहे.

## निवृत्त PI चा विहिरीत पडून मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील बाळापूर शिवार परिसरात एका निवृत्त पोलीस निरीक्षकाचा कोरड्या विहिरीत पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शुक्रवारी ३ एप्रिलला सकाळी ही घटना उघडकीस आली. अग्निशमन दलाने अथक प्रयत्नानंतर त्यांचे पार्थिव विहिरीतून बाहेर काढले. भीमराव कारभारी घुगे असे या मृत अधिकाऱ्याचे नाव आहे. ते ६२ वर्षांचे होते. या घटनेनंत परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. ही घटना नेमकी कशी घडली? याचा तपास आता पोलीस करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, बाळापूर शिवार येथील एका कोरड्या विहिरीत एक व्यक्ती पडल्याची माहिती समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी अनेक गावकरी जमले होते. संबंधित घटना वाऱ्यासारखी गावात पसरली होती. यानंतर गावकऱ्यांनी पोलिसांना या घटनेची माहिती दिली. पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.यानंतर पीएसआय तांगडे यांनी अग्निशमन दलाला दिली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पदमपुरा अग्निशमन केंद्राचे पथक सकाळी ११ वाजेच्या सुमारास तातडीने घटनास्थळी रवाना झाले. विहिरीत पडलेली व्यक्ती भीमराव



घुगे असल्याचे निष्पन्न झाले, जे पोलीस दलातून निरीक्षक म्हणून निवृत्त झाले होते.उप अग्निशमन अधिकारी हरिभाऊ घुगे आणि ड्युटी इंचार्ज संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी विहिरीत उतरून शोध मोहीम राबवली. मात्र, विहिरीत पडल्याने घुगे यांचा मृत्यू झाला होता. जवानांनी त्यांचे पार्थिव बाहेर काढून चिखलठाणा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. भीमराव घुगे यांनी पोलीस दलात प्रदीर्घ सेवा बजावली होती. त्यांच्या निधनाची बातमी समजताच पोलीस वर्तुळात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. ते विहिरीत नेमके कसे पडले, हा अपघात होता की अन्य काही कारण, याचा तपास आता चिखलठाणा पोलीस करत आहेत. या मदतकार्यात अग्निशामक जवान दिनेश मुंगसे, प्रसाद शिंदे, दिपक गाडेकर आणि वाहन चालक जगदीश सलामबाद यांनी सहभाग घेतला.

# माळरानात कांदा काढत असताना वीज कोसळली, माजी उपसरपंचाच्या भावाचा मृत्यू

**सातारा :** कराड तालुक्यात शुक्रवारी (3 एप्रिल) दुपारी वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाने थैमान घातले. यावेळी शेतातील कांदा काढत असतानाच अंगावर वीज कोसळून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. सतीश नाथा सुर्यवंशी असे मृताचे नाव आहे. सतीश सुर्यवंशी हे कराड तालुक्यातील भोळेवाडी गावचे रहिवासी होते. तसेच भोळेवाडी गावचे माजी उपसरपंच शंकर नाथा सुर्यवंशी यांचे ते बंधू होते. दरम्यान, वादळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान होऊन शेतकरी हतबल असताना प्रशासन मात्र जिल्हा परिषद पदाधिकारी निवडणुकीत मग्न असल्याचा आरोप केला जात आहे.सातारा जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या





वादळी पावसाने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच वीज कोसळल्याने २५ शेळ्या-मेंढ्यांसह एक मेंढपाळ महिला आणि एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. काढणीला आलेल्या पिकांचे वादळी पावसाने मोठे नुकसान केल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. सरकारने नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले असतानाही सातारा जिल्हा प्रशासन मात्र राजकारणात मश्गुल असल्याचे दिसत असल्याचे आरोप सर्वसामान्यांकडून केले जात आहे.सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, खंडाळा, फलटण, लोणंद या दुष्काळी भागात वळीव पावसाने दमदार हजेरी लावली होती. त्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून कराड तालुक्यातील दक्षिण मांड खोऱ्याला देखील वळीवाने झोडपून काढले आहे. वाऱ्यामुळे घरांवरील पत्रे उडून गेले आहेत. तसेच गारपीटीमुळे सोलर पॅनलचे नुकसान झाले आहे. कोयनाकाठ परिसरात शुक्रवारी दुपारी वीज कोसळून भोळेवाडी गावातील शेतकऱ्याचा मृत्यू झाला.सातारा जिल्ह्यात चार दिवसांपासून वादळी पावसाने प्रचंड नुकसान झाले असताना जिल्हा प्रशासन मात्र झेडपी पदाधिकारी निवडणुकीच्या धामधुमीत मग्न असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. नुकसानीची पाहणी करण्यासाठी देखील अधिकाऱ्यांना वेळ नाही. नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश सरकारने दिले असले तरी महसूल प्रशासनाने नुकसानीची अद्याप पाहणी देखील केलेली नाही, असा आरोप सर्वसामान्यांकडून केला जात आहे.

माण, खटाव, खंडाळा, फलटण, लोणंद या दुष्काळी भागात वळीव पावसाने दमदार हजेरी लावली होती. त्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून कराड तालुक्यातील दक्षिण मांड खोऱ्याला देखील वळीवाने झोडपून काढले आहे. वाऱ्यामुळे घरांवरील पत्रे उडून गेले आहेत. तसेच गारपीटीमुळे सोलर पॅनलचे नुकसान झाले आहे.

# चेन्नई सुपर किंग्स 'घरी' पण हरले




## चेपॉकवर पंजाबचा 5 विकेट्सनी दणदणीत विजय : अय्यरची फिफ्टी..

**चेन्नई/वृत्तसंस्था :** शुक्रवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सकडून चेन्नईला 6 गड्यांनी पराभवाचा सामना करावा लागला. सलग दोन विजयांसह पंजाबचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईने 20 षटकांत 5 बाद 209 धावा केल्या. यानंतर विजयासाठीचे 210 धावांचे टार्गेट पंजाबने सहज पार केले. विशेष म्हणजे, चेन्नईचे सर्व गोलंदाज निष्प्रभ ठरले आणि त्यांना सलग दुसरा पराभव स्वीकारावा लागला. 11 चेंडूत 39 धावा झोडपणाऱ्या प्रियांश आर्यला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

प्रारंभी, पंजाबने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या चेन्नईकडून ऋतुराज गायकवाड आणि संजू सॅमसनची जोडी मैदानावर आली. पण या जोडीला हवी तशी सुरूवात करून देता आली नाही. संजू सॅमसन अवघ्या 7 धावा करून माघारी परतला. त्यानंतर ऋतुराज गायकवाड आणि आयुष म्हात्रे या दोघांनी मिळून 96 धावांची भागीदारी केली. यादरम्यान गायकवाड 28 धावा



करून माघारी परतला. तर आयुष म्हात्रेने 43 चेंडूत 73 धावांची खेळी केली. शिवम दुबेने 27 चेंडूत नाबाद 45 धावांची खेळी केली. शेवटी सर्फराज खानने 12 चेंडूत 32 धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्ज संघाने 20 षटकांत 5 गडी बाद 209 धावा केल्या.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना सलामीला आलेल्या प्रियांश आर्यने अवघ्या 11 चेंडूत 3 चौकार आणि 4 षटकारांच्या साहाय्याने 39 धावांची खेळी केली. तर प्रभसिमरन सिंगने 34 चेंडूंचा सामना करुन 6 चौकार आणि 1 षटकारांच्या साहाय्याने 43 धावांचे योगदान दिले. सर्फराज खानने त्याला धावबाद करून माघारी धाडले, यामुळे त्याचं अर्धशतक थोडक्यात हुकले. गेल्या सामन्यातील विजयाचा हिरो ठरलेल्या कुपर कोनोलीला चांगली सुरूवात मिळाली होती. पण तो 22 चेंडूत 36 धावा करून माघारी परतला. दुसरीकडे, कर्णधार श्रेयस अय्यरनेही शानदार खेळी साकारताना 29 चेंडूत 4 चौकार आणि 3 षटकारासह 50 धावांची महत्वपूर्ण खेळी साकारली. शेवटी चेन्नईने लागोपाठ दोन विकेट्स घेत पंजाबवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला पण शशांक सिंगने 6 चेंडूत नाबाद 14 धावा करत संघाला 18.4 षटकांत विजय मिळवून दिला.

## केकेआरला धुतलं, मॅचही जिंकली पण हैदराबादच्या अभिषेकची मॅच फी कापली

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ मध्ये गुरूवारी कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यामध्ये पार पडला. या सामन्यात केकेआरला घरच्या मैदानावर हैदराबादने ६५ धावांनी पराभूत केले. ईशान किशन याच्या नेतृत्वात हैदराबाद संघाने आपला पहिला विजय साकार केला. तर केकेआरला यंदाच्या मोसमातील हा सलग दुसरा पराभव ठरला आहे. या सामन्यात युवा खेळाडू अभिषेक शर्मा याने आक्रमक खेळी करत झकास सुरुवात करून दिली होती. मात्र सामना संपल्यावर बीसीसीआयने अभिषेक शर्मांला दंड ठोठावला आहे.अभिषेक शर्मा याची २५ टक्के मॅच फी कापली आहे. त्यासोबतच आयपीएलचा कोड ऑफ कंडक्ट कलम २.३ चे उल्लघन केल्याप्रकरणी एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे. कलम २.३ नुसार अभिषेक याने अश्लील शब्दांसह चुकीच्या शब्दांचा वापर केल्याने त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. अभिषेक शर्मने या सामन्यामध्ये २१ चेंडूत ४८ धावांची खेळी केली, यामध्ये ४ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश आहे. अभिषेकनेही त्याची चूक मान्य केली आहे.या सामन्यामध्ये सनरायजर्स हैदराबाद संघाने २० ओव्हरमध्ये २२६-८ धावा केल्या होत्या. यामध्ये हेड आणि अभिषेकने ४८ धावा तर क्लासेन याने ५२ धावांची अर्धशतकी खेळी करत संघाला २२६ पर्यंत मजल मारून दिली होती. केकेआरकडून बेसिंग मुजरबानी याने सर्वाधिक ४ विकेट आपल्या नावावर केल्या. केकेआरचा संघ बॅटींगल उतरल्यावर त्यांनी दमदार सुरुवात केली होती. पण विकेट जायला लागल्यावर एकसारख्या विकेट गेल्या आणि धावांचा दबाव वाढल्याने




त्यांना १६१ वरऑल आऊट झाले होते. या सामन्यात हैदराबादने ६५ धावांनी विजय मिळवला आहे.कोलकाता नाईट रायडर्स प्लेइंग ११: अजिंक्य रहाणे (C), कॅमेरुन ग्रीन, अंगक्रृश रघुवंशी (WK), रिंकू सिंग, रमणदीप सिंग, अनुकुल रॉय, सुनील नारायण, वरुण चक्रवर्ती, वैभव अरोरा, कार्तिक त्यागी आणि ब्लेसिंग मुजरबानी.सनरायजर्स हैदराबाद प्लेइंग ११: इशान किशन (C&WK), अभिषेक शर्मा, ट्रेव्हिस हेड, हेनरिक क्लासेन, अनिकेत वर्मा, नितीश कुमार रेड्डी, सलील अरोरा, हर्ष दुबे, शिवांग कुमार, जयदेव उनाडकट आणि डेव्हिड पेन.

## गोयंकांना बॅन करा, माझे दाजी असले तरी खेळ आधी'; ललित मोदी भडकला

**मुंबई/वृत्तसंस्था :** दिल्ली कॅपिटल्सकडून पराभव पत्करावा लागल्यानंतर लखनौ सुपर जायंट्स संघाचे संघमालक संजीव गोयंका नाराज दिसले. याबाबत ते कर्णधार ऋषभ पंत आणि प्रशिक्षक जस्टीन लँग यांच्यासह गंभीर चचर्चदिखील करत होते. हा व्हिडिओ सोशल मीडियाव कायरल झाला आणि पुन्हा गोयंका चर्चेत आले. या आधी गोएंका यांनी माजी कर्णधार के. एल. राहुल याला पराभवानंतर फैलावर घेतल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. गोएंका यांच्या स्वभावामुळेच राहुलने संघ सोडल्याचे नंतर बोलले गेले. यंदाच्या मोसमातही गोएंका थेट हस्तक्षेप करत असल्याचे पाहून क्रिकेटप्रेमींनी त्यांच्यावर टीका सुरू केली आहे.

यानंतर गोयंका यांनी पोस्ट करत कॅप्टनसह संघावर आपला पूर्ण विश्वास असल्याचं सांगितलं होतं. याचाच धागा पकडत आयपीएलचे माजी चेअरमन ललित मोदी याने गोयंका यांच्यावरुन निशाणा साधला आहेहा सीझन खूप मोठा आहे. मला आपल्या कॅप्टन आणि संघावर पूर्ण विश्वास असून ते दमदार



कमबॅक करतील. लखनौच्या सर्व चाहत्यांचे मनापासून आभार त्यांनी उपस्थित राहून सपोर्ट केला, असं संजीव गोयंका यांनी म्हटलं होतं. ललित मोदीने या पोस्टला रिप्लाय करत त्यांच्यावर टीका केलीय.तुम्ही आयपीएलची प्रतिमा मलिन करत आहात, तुमच्यावर बंदी घातली जाईल, स्वत: च्या भल्यासाठी राजीनामा द्या आणि स्टेडियमच्या बाहेर राहा. कारण तुम्ही या खेळासह खेळाच्या प्रतिष्ठेसाठी आणि सर्वात महत्वाचं चाहते, खेळाडूंसाठी विष आहात. तुम्ही तुमच्या फॅक्टरीमध्येच राहा, तुम्ही माझे दाजी आहात पण खेळ पहिला तुम्ही नाही, असं ललित मोदीने म्हणत गोयंका यांच्यावर टीका केली आहे. याआधीसुद्धा ललित मोदी गोयंका यांना जोकर म्हटले होते.

## पंजाबने फक्त दोन खेळाडूंच्या जीवावर सामना जिंकला

**चेन्नई/वृत्तसंस्था :** गेल्या मोसमाच्या अंतिम सामन्यात पराभूत झालेल्या पंजाब किंग्सने पुन्हा एकदा विजयाची लय मिळवली आहे. दुसऱ्या सामन्यात, पंजाबने चेन्नईच्या चेपॉकच्या मैदानावर 210 धावांचे मोठे लक्ष्य यशस्वीपणे पार केले आणि एक मोठा विजय नोंदवला. चेन्नईचे गोलंदाज 209 धावांचा बचाव करू शकले नाहीत. कर्णधार श्रेयस अय्यरने (50) विजयाचा पाया रचला, तर शशांक सिंग आणि मार्कस स्टोइनिस यांनी अखेरीस सामना सोपा करून टाकला. या विजयासह, पंजाबने आपला सलग दुसरा विजय नोंदवला आणि 4 गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवले.

मला वाटतं आमच्यासाठी ही एक उत्तम सुरुवात होती. प्रियांश आणि प्रभने सुरुवातीलाच




आपलं काम चोख बजावलं आणि आम्हाला पुढे चांगली कामगिरी करण्यासाठी मंच तयार करून दिला. आणि मला वैयक्तिकरित्या असं वाटतं की, गेल्या काही वर्षांपासून ज्या प्रकारे ते फलंदाजी करत आहेत, त्यांनी आम्हाला अशी सुरुवात करून दिली हे पाहून खूप आनंद होतो आणि त्यामुळे आमची लय कायम राहते. हो, अगदी बरोबर. मला आनंद आहे की पहिल्या दोन सामन्यांमध्ये प्रत्येकाला फलंदाजीची संधी मिळत आहे," असे श्रेयस अय्यर बक्षीस वितरण समारंभात म्हणाला.यामुळे संघाचा आत्मविश्वासही खूप वाढतो. त्यामुळे, जेव्हा कधी आम्ही दबावाच्या परिस्थितीत सापडतो, तेव्हा खेळाडूंना ते कसे हाताळायचे हे माहीत असते. आम्ही ड्रेसिंग रूममध्ये नुकताच निर्णय घेतला आहे की काहीही झाले तरी, आम्ही क्रिकेटची अशी शैली अवलंबणार आहोत जी एकमेकांवर प्रभाव टाकेल, बाहेरील जगावर नाही. त्यामुळे, आम्हाला खेळाबद्दल एक निश्चित स्पष्टता मिळते," असे तो पुढे म्हणाला. चेन्नईसाठी आयुष म्हात्रेच्या बॅटने धुमाकूळ घातला. संघ चेन्नईमध्ये प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरला. संजू सॅमसन पुन्हा एकदा चेन्नईसाठी अपयशी ठरला आणि त्याने केवळ ७ धावा केल्या. कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि आयुष म्हात्रे यांनी डाव सावरला. त्यांनी 96 धावांची सलामीची भागीदारी केली, ज्यात गायकवाडने 22 चेंडूंमध्ये 28 धावा केल्या. दरम्यान, आयुष म्हात्रेने शानदार फलंदाजी करत 6 चौकार आणि 5 षटकारांच्या मदतीने 43 चेंडूंमध्ये 73 धावा केल्या. शिवम दुबेनेही 27 चेंडूंमध्ये नाबाद 45 धावांची खेळी केली, ज्यामुळे चेन्नईला 20 षटकांत 5 गडी गमावून 209 धावांचा डोंगर उभा करता आला. पंजाबकडून विजयकुमार वैशाकने २ बळी घेतले. 210 धावांचे लक्ष्य गाठताना, पंजाब किंग्सने सलामीवीर प्रियांश आर्यने 11 चेंडूंमध्ये 39 धावा केल्या. दुसरा सलामीवीर, प्रभसिमरन सिंगने 34 चेंडूंमध्ये 43 धावा केल्या. दोघांनी 61 धावांची मजबूत सलामीची भागीदारी केली. त्यानंतर, तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या कूपर कॉनोलीने 22 चेंडूंमध्ये 36 धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरने 29 चेंडूंमध्ये 50 धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, पण विजय निश्चित करण्यापूर्वीच तो अंशुल कंबोजच्या गोलंदाजीवर बाद झाला. शशांक सिंग (14) आणि मार्कस स्टोइनिस (9) यांनी सहज विजय मिळवून दिला. त्यांनी आपल्या संघाला 18.4 षटकांत 5 गडी गमावून 210 धावांपर्यंत पोहोचवले आणि सहा गडी राखून विजय मिळवला.

# 'मला पुन्हा जेलमध्ये पाठवा...' चेक बाऊन्स प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान राजपाल यादव भावूक

बॉलिवूडमधील लोकप्रिय विनोदी अभिनेता राजपाल यादव पुन्हा एकदा त्याच्या ९ कोटी रुपयांच्या चेक बाऊन्स प्रकरणामुळे चर्चेत आले आहेत. या प्रकरणात अलीकडेच त्याला तुरुंगवास भोगावा लागला होता. मात्र नंतर त्याला अंतरिम जामीन मिळाला. आता या केसच्या सुनावणीदरम्यान घडलेल्या एका भावनिक प्रसंगामुळे हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे.

या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती स्वरणा कांता शर्मा यांच्या एकलपीठासमोर सुरू आहे. न्यायालयाने याआधीच राजपाल यादव यांना थकीत रक्कम भरण्यासाठी अंतिम संधी दिली होती. त्यांनी काही रक्कम भरल्यामुळे त्यांना दिलासा मिळाला होता. मात्र अद्याप मोठी रक्कम बाकी असल्याचे समोर आले आहे.

२ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान राजपाल यादव भावनिक झाले. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे हजर राहून त्यांनी न्यायालयासमोर आपली बाजू मांडताना दावा केला की, या प्रकरणामुळे त्याला मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्याला आपली प्रॉपर्टी विकावी लागली आहे.



यावेळी "मला आणखी पाच वेळा तुरुंगात पाठवा," असे उद्गार काढले. त्यांच्या या विधानामुळे कोर्टात काही काळ न्यायाधीश नाराज झाले. या दरम्यान, न्यायाधीशांनी त्यांच्या वारंवार बदलणाऱ्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत त्यांना फटकारले. "न्यायालय सौजन्याने वागत असल्याचा गैरफायदा घेऊ नका," असा इशारा देत न्यायालयाने स्पष्ट केले की, जर पैसे भरण्याची तयारी असेल, तर ती तात्काळ पूर्ण करावी. विरोधी पक्षाचे वकील अवनीत सिंग सिक्का यांनी सांगितले की, अद्याप सुमारे ७.७५ कोटी रुपये थकीत आहेत. दोन्ही पक्षांमध्ये समझोता करण्याचे प्रयत्न झाले. अगदी ६ कोटी रुपयांवर तोडगा काढण्यावर कोर्टात सुनावणी झाली. दरम्यान, राजपाल यादवने ६ कोटी रुपयांची परतफेड करण्यासाठी आणि हा वाद मिटवण्यासाठी ३० दिवसांची मुदतवाढ देण्याची विनंती केली होती; परंतु न्यायाधीशांनी ही विनंती फेटाळून लावली. न्यायमूर्ती शर्मा यांनी स्पष्ट केले, "नाही म्हणजे नाहीच. मी माझा आदेश राखून ठेवत आहे. मी आता यापुढे कोणतीही मुदत देणार नाही." तूर्तास, राजपाल यादवला दिलासा मिळेल की त्याच्या अडचणी आणखी वाढतील, हे अद्याप अस्पष्ट आहे. न्यायालयाचा आदेश आल्यानंतरच हे स्पष्ट होईल. येत्या काही दिवसांत येणाऱ्या अंतिम निकालाद्वारे या प्रकरणाचा निर्णय घेतला जाईल.

## तुझी जात कोणती? अग्गबाई सुनबाई' मालिकेच्या सेटवर अभिनेत्यानं विचारलेला प्रश्न

कलाकारांना त्यांच्या कामाने ओळख मिळावी अशी एक सर्वसाधारण अपेक्षा असते. पण, काही वेळेस कलाकारांना त्यांच्या दिसण्यावरून, जातीवरून डिवचलं जातं. काही अभिनेत्रींना सिनेमाच्या आणि मालिकेच्या सेटवर खूप त्रास सहन करावा लागतो. अशातच आता मराठी अभिनेत्रीनं तिला झी मराठीच्या मालिकेच्या सेटवर कशी वागणूक मिळाली, याबद्दल सांगितलं आहे. मालिकेच्या सेटवर एका अभिनेत्यानं तिला जात विचारली, असं अभिनेत्रीनं सांगितलं आहे.लोकप्रिय अभिनेत्री गीतांजली गणगेनं अनेक हिंदी आणि मराठी मालिकांमध्ये काम केलं आहे. गीतांजली झी मराठी वाहिनीवरील 'अग्गबाई सुनबाई' या लोकप्रिय मालिकेतूनही प्रेक्षकांच्या भेटीला आलेली. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये अभिनेत्रीनं 'अग्गबाई सुनबाई' या मालिकेच्या सेटवरील धक्कादायक अनुभव शेअर केलं आहे. गीतांजली गणगेनं Raw Cast With Rao या युट्युब चॅनलला हजेरी लावली. या मुलाखतीमध्ये अभिनेत्रीनं अनेक अनुभव शेअर केले. मुलाखतीदरम्यान 'अग्गबाई सुनबाई' मालिकेच्या सेटवरचा अनुभव शेअर करत गीतांजली म्हणाली की, 'मला हिंदी मालिकेमध्ये छान अनुभव मिळाला. 'अग्गबाई सुनबाई' या झी मराठीच्या मालिकेत मी काम करत होते.



करोनाच्या काळात मालिकेचं शुटिंग झालेलं. महाराष्ट्रात शुटिंग करण्याची परवानगी नव्हती. आमची ५०-६० लोकांची टीम होती. आम्ही दमणमध्ये मालिकेचं शुटिंग केलं. एकाच सेटवर असल्यामुळे कंटाळा यायचा. खूप वाईट अनुभव होता तो.'मालिकेत डॉ गिरीश ओक, मोहन जोशी, निवेदिता सराफ, अद्वैत दादरकर असे मोठे कलाकार होते. त्या मालिकेच्या एका कलाकाराने मला, मग तुझी जात कुठली? असा प्रश्न विचारला. त्याच्या प्रश्नानंतर मी विचारातच पडले की, याने जात का विचारली? मी मनात थोडीशी हलले. मला सुरुवातीपासूनच जातीवादाची खूप चीड आहे. काय गरज आहे? कोणत्या जातीची आहे. माणसासारखं वागवा ना एकमेकांना.' असं गीतांजलीनं पुढे म्हटलं.

## श्रीदेवीचं ते गाणं, 34 वर्षांनी आजही तेवढंच प्रसिद्ध

श्रीदेवी ही अशी एक अभिनेत्री होऊन गेली, जिने आपल्या अभिनयाच्या जोरावर संपूर्ण बॉलिवुडवर राज्य केले. तिने अभिनय केलेल्या अनेक चित्रपटांनी अक्षरशः छप्परफाड कमाई केली. तिच्या चित्राटातील काही गाणी आजही अनेकांना तोंडपाठ आहेत.श्रीदेवीने नव्वदचे दशक चांगलेच गाजवले. त्या काळातील तिच्या चित्राटांत अनेक प्रसिद्ध गाणे आहेत. यातीलच एक गाणे आजही तेवढ्याच आवडीन ऐकले जाते. हे गाणे ऐकून काही लोकांचे डोळे तर चिंब होतात. प्रेम, विरहाने ओतप्रेत असलेलं हे गाणं चांगलंच प्रसिद्ध आहे.साधारण 34 सालापूर्वी तू ना जा मेरे बादशाह हे गाणे आले होते. खुदा गवाह या चित्रपटातील हे गीत असून ते आवडीने ऐकले जाते. या गाण्यात श्रीदेवी आणि दिग्गज अभिनेते अमिताभ बच्चन आहेत. अनेकांच्या प्ले लिस्टमध्ये हे गाणे आवर्जुन पाहायला मिळते. हे गीत 4 मिनिटे आणि 29 सेकंदांचे आहे. या गाण्यातील संगीत, गायन मनाचा ठाव घेणारे आहे. कुणी याला विरहगीत म्हणतं तर कोणी याला प्रेमभावनेने ओथंबलेले गीत आहे, असे सागतं.

## छावा' फेम आशिष पाथोडेच्या घरी हलला पाळणा, चिमुकल्याचं आगमन

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' हा सिनेमा प्रचंड गाजला. या सिनेमाला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला असून या सिनेमानं बॉक्स ऑफिसवर ५०० कोटींचा आकडा पार केला. 'छावा' मध्ये विकी कौशल मुख्य भूमिकेत होता. त्याचबरोबर अनेक कलाकारांनी महत्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. 'छावा' मध्ये आशिष पाथोडेनं अंताजींची भूमिका साकारलेली. त्याच्या या भूमिकेला प्रेक्षकांचं भरघोस प्रेम मिळालं. अशातच आता आशिषनं चाहत्यांसोबत एक गुड न्यूज शेअर केली असून अभिनेता बाबा झाला आहे.अभिनेता आशिष पाथोडेनं सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. आशिष पाथोडेला मुलगा झाला असून अभिनेत्यानं इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत गुड न्यूज दिली आहे. 'आमचा हात धरण्यासाठी एक नवा हात, त्याचं प्रेम सोन्यासारखेच अनमोल, देवाने दिलेली एक अमूल्य भेट, आमची हृदये प्रेमानं ओतप्रोत भरलेली आहेत...मुलगा झाला...कृतज्ञ पालक: प्रियांका आणि आशिष' असं म्हणत आशिषने आनंद व्यक्त केला आहे. आशिष पाथोडेनं काल २ एप्रिल २०२६ रोजी चिमुकल्याचं स्वागत केलं.आशिष पाथोडेच्या पोस्टवर चाहत्यांनी आणि कलाकारांनी कमेंट्स करत त्याला शुभेच्छा दिसल्या आहेत. 'अभिनंदन दादा आणि वहिनी', 'दोघांचं अभिनंदन', 'अभिनंदन आशिष दादा' अशा कमेंट्स करत आशिष आणि त्याच्या पत्नीला शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, आशिष पाथोडेच्या कामाबद्दल सांगायचं तर त्यानं, 'ठाकरे' सिनेमात जावेद मियाँदादची भूमिका साकारली. त्याचबरोबर त्यानं 'तान्हाजी', 'हाउसफुल्ल थ्री', 'मिमी', 'आदीपुरुष', 'सालार', 'सॅम बहादूर', 'घरत गणपती' यांसारख्या अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे. तसंच आशिषनं 'का रे दुरावा', 'क्राइम पॅट्रोल' यांसारख्या मालिकांमध्येही काम केलंय. इतकंच नव्हे तर इमरान हाश्मी, नवाजुद्दिन सिद्दिकी, प्रभास, अजय देवगण, सैफ अली खान , विकी कौशल, नर्गिस फाखरी, बोमन इराणी, सोनाक्षी सिन्हा, दलजित दोसांज अशा अनेक कलाकारांना त्यानं प्रशिक्षित केलंय.

# पहिल्या बायकोला ६ महिन्यांच्या लेकीसोबत सोडून रोनित रॉयने थाटला दुसरा संसार, घटस्फोटानंतर ती कसं जगतेय आयुष्य ?

रोनित रॉय (Ronit Roy) याला आज कोणत्या वेगळ्या ओळखीची गरज नाही. 'कसोटी जिंदगी की', 'क्राईम पेट्रोल' यांसारख्या मालिकांमध्ये दमदार भूमिका साकारत अभिनेत्याने चाहत्यांच्या मनावर राज्य केलं. पण खासगी आयुष्यात मात्र अभिनेत्याने अनेक उतार – चढाव पाहिलेले आहेत. रोनित फक्त त्याच्या प्रोफेशनल आयुष्यामुळेच नाही तर, खासगी आयुष्यामुळे कायम चर्चेत असतो. अभिनेत्याला अनेकदा पत्नी आणि मुलांसोबत स्पॉट करण्यात आलं आहे. पण ते रोनित याचं दुसरं कुटुंब आहे. मुलगी फक्त 6 महिन्यांची असताना अभिनेत्याने पहिल्या बायकोची साथ सोडली आणि दुसरा संसार थाटला. आज अभिनेता दुसऱ्या कुटुंबासोबत आनंदाने आयुष्य जगत आहे.रोनित रॉय याचं पहिलं लग्न झोआना मुमताज खान हिच्यासोबतट झालं. दोघांना एक मुलगी देखील आहे. झुआना दुसरी तिसरी कोणी नाही तर, सुपरस्टार दिलीप कुमार यांची भाची आहे. 90 च्या दशकात दोघांनी लग्न केलं. तेव्हा रोनित इंडस्ट्रीमध्ये स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता... आज रोनित याला कोणत्या ओळखीची गरज नाही. पण तेव्हा अभिनेत्याने करियरमध्ये फार मोठा खस्ता खाल्लाय आहे... 'क्योंकि सास भी कभी बहू थी' आणि फिल्म 'उड़ान' सिनेमानंतर अभिनेत्याच्या लोकप्रियतेत मोठी वाढ झाली... रोनित याच्या खासगी आयुष्याबद्दल सांगायचं



झालं तर, रोनित आणि झोआना यांचं लग्न फार काळ टिकलं नाही. मुलीच्या जन्मानंतर देखील दोघांना त्यांचं नातं टिकवता आलं नाही.. लेक 6 महिन्यांचीचच असताना, झोआना आणि रोनित यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. दोघांच्या विभक्त होण्याचं कारण, वाढता दुरावा आणि खासगी आयुष्यात येणाऱ्या अडचणी होत्या.

पहिल्या बायकोला घटस्फोट दिल्यानंतर अभिनेत्याने दुसरा संसार थाटला. 2003 मध्ये रोनित याने अभिनेत्री आणि मॉडेल नीलम सिंग हिच्यासोबत लग्न केलं. रोनित आणि नीलम यांना एक मुलगा आणि एक मुलगी देखील आहे. दुसऱ्या कुटुंबासोबत अभिनेता आज आनंदी आयुष्य जगत आहे. तर अभिनेत्याची पहिली पत्नी मुलगी ओना हिच्यासोबत राहत आहे.

# जळगाव जामोदमध्ये देशी पिस्तुलासह तिघे जेरबंद



जनसंचलन/ जळगाव जामोद

आगामी सणोत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक केली आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या आदेशानुसार मध्य प्रदेश सीमेलगत असलेल्या सोनाळा, तामगाव व जळगाव जामोद परिसरात अवैध अग्निशस्त्रांची तस्करी रोखण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. १ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, जळगाव जामोद येथील श्रीमंत ढाबा परिसरात काही व्यक्तींनी अवैधरीत्या देशी बनावटीचे पिस्तूल विक्रीसाठी आणले आहे. या माहितीच्या आधारे पथकाने तातडीने धाड टाकून पवन इंदरसिंग डावर (२३, रा. राजूर बु.), संजय भिलासिंग बोडल (२०, रा. राजुरा बु, ता. जळगाव जामोद) व रमेश दुर्गासिंग बारेला (२४, रा. इस्लामपूर, ता. जळगाव जामोद) यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी गणेश पाटील यांच्या तक्रारीवरून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचा जिल्हा दौरा



जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर हे मंगळवार व बुधवार दि. ७ व ८ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर आहे. दौऱ्यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी संदर्भात विविध विभागाचा आढावा घेणार आहे. त्यांचा दौरा कार्यक्रमानुसार मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजता शेगाव सर्कीट हाऊस येथे आगमन व राखीव. बुधवार दि. ८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शेगाव येथून बुलढाणाकडे प्रयाण, दुपारी १२ वाजता सफाई कर्मचारी संघटना सोबत बैठक व चर्चा. दुपारी २ ते ३ वाजेपर्यंत भोजन व राखीव. दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे बाबतच्या अधिनियम २०१३ ची अंमलबजावणी बाबत तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारणाकरीता केलेल्या उपाययोजना संदर्भात आढावा बैठक. बैठकीनंतर पत्रकार परिषद होईल. सायंकाळी ५ वाजता सफाई कर्मच्याऱ्यांच्या वस्त्यांना भेट व चर्चा. त्यानंतर रात्री ७ वाजता बुलढाणा सर्कीट हाऊस येथे मुक्काम राहणार आहे


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# मानधनवाढ रखडल्याने जिल्ह्यातील ग्रामरोजगार सहायकांचे कामबंद आंदोलन

जनसंचलन/बुलढाणा

मानधनवाढीचा शासन निर्णय जाहीर होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने जिल्ह्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांनी १ एप्रिलपासून कामबंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा संघटनेने दिला असून, सुमारे ८५० सहाय्यक या आंदोलनात सहभागी झाले आहेत. रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी गावपातळीवर प्रभावीपणे करणाऱ्या या सहाय्यकांना अनेक वर्षे अत्यल्प मानधनावर काम करावे लागत आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मानधन वाढविण्याची मागणी राज्यभरातून सातत्याने होत होती. त्यानुसार शासनाने ऑक्टोबर २०२४ मध्ये दरमहा ८ हजार रुपये मानधन आणि २ हजार रुपये डेटा भत्ता देण्याचा निर्णय जाहीर केला; मात्र सहा महिन्यांहून अधिक काळ यापूर्वी ग्रामरोजगार सहायकांनी कामबंद आंदोलन केले होते. पण आता बेमुदत कामबंद आंदोलन सुरू आहे. निर्णयाची उलटूनही या अंमलबजावणी न झाल्याने तीव्र नाराजी आहे. निर्णय झाला, पण लाभ नाही, अशी भूमिका घेत ग्रामरोजगार सहाय्यकांनी अखेर कामबंद आंदोलन छेडले. आंदोलनात जिल्हाध्यक्ष श्रीमंत देशमुख, पृथ्वीराज गवई, संजय मोरे, ज्ञानेश्वर गावडे, सुरज रगड, दीपक गवई, अर्जुन ढगे, मदन खरात, दिनकर मोरे व अन्य सहभागी झाले आहेत.


पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क

***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040 पिन 443001

# जिल्हाधिकारी कचेरीवर धडाडला लोकशाहीचा चौथा स्तंभ!

## जाहिरात दरात १५० टक्के वाढीसाठी बुलढाण्यात व्हॉईस ऑफ मीडियाचे दोन तास धरणे आंदोलन

**जनसंचलन/बुलढाणा**

अन्यायकारक धोरणे बदला, अन्यथा वृत्तपत्र उद्योग बंद पडेल! अशी आक्रमक भूमिका घेत आज व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दोन तास धरणे आंदोलन करण्यात आले. गेल्या सहा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्या आणि पत्रकारांवर होणारे जीवघेणे हल्ले याविरोधात पत्रकारांनी जिल्हाधिकारी कार्यालय दणाणून सोडले. संघटनेने प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष वैभवराजे मोहिते यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले. सन २०१९ पासून कागद, शाई, प्रिंटिंग मटेरियल आणि वीज दरात प्रचंड वाढ झाली आहे. मात्र, शासनाचे जाहिरात दर ७ वर्षांपूर्वीचेच असल्याने वृत्तपत्रे आर्थिक संकटात सापडली आहेत. यावर उपाय म्हणून जाहिरात दरात तातडीने १५० टक्के वाढ करावी. ई-टेंडर जाहिराती संक्षिप्त न छापता पूर्ण स्वरूपात द्याव्यात. जाहिरात देयके ३० दिवसांच्या आत व्याजासह अदा करावीत.लघु व मध्यम वृत्तपत्रांना जाहिरात वाटपात समान संधी मिळावी, अशा मागण्या करत पत्रकारांवरील दडपशाहीचा तथा राज्यात सुरू असलेल्या टार्गेट पॉलिटिक्सचा निषेध करण्यात आला. अकोल्यातील पत्रकारांना झालेली कोठडी, नांदेडमधील महिला पत्रकार मुक्ता कदम यांच्यावर दाखल झालेले गुन्हे आणि अर्धापूर येथील पत्रकार मनोज मन्नपूर्वे यांच्या अपहरणाचा प्रयत्न, या घटना लोकशाहीसाठी घातक असल्याचे यावेळी आंदोलकांनी नमूद करत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. यावेळी प्रदेश कार्यकारिणी प्रतिनिधी अरुण जैन, विदर्भ संघटक सिद्धार्थ आराख, माजी जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे, कृष्णा सपकाळ, तालुका अध्यक्ष डॉ.विजय जट्टे, नितीन कानडजे, शौकत शहा, प्रवीण थोरात, हर्षनंदन वाघ, शेख नदीम, आत्माराम सोनूने, साबीर अली, सचिन लहाने, सोहम घाडगे, सुखनंदन इंगळे, अक्षय थीगळे, किरण नाईक, जाकीर शाह, शेख



इद्रिस, दीपक मोरे, नीलेश राऊत, सुनील तिजारे, सोहील शाह, सुनील खंडारे, संदीप वानखेडे, पवन सोनारे, नीलेश जोशी, संजय जाधव, सागर जयस्वाल, राम चतुर यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते., अशी माहिती व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संदीप वंत्रोले यांनी दिली आहे.

## माझ्या रक्तात काँग्रेसच! राहुल बोंद्रे यांचा ठाम इशारा; अफवांना दिला करारा फुलस्टॉप...

**जनसंचलन/ चिखली**

सध्या जिल्ह्यात रंगलेल्या राजकीय घडामोडींमध्ये काँग्रेसचे माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी ठाम आणि आक्रमक भूमिका घेत सर्व अफवांना अक्षरशः चिरडून टाकले आहे. शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या भेटीनंतर बोंद्रे हे पक्षांतर करणार, अशा चर्चांनी जोर धरला होता. मात्र, स्वतः बोंद्रे यांनी यावर स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया देत या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला. गायकवाड यांची भेट ही केवळ औपचारिक होती. त्यामागे कोणतेही राजकीय समीकरण नाही,फ्फ असे स्पष्ट करत बोंद्रे म्हणाले, ङ्क्कमाझ्या रक्तात काँग्रेस आहे आणि मी काँग्रेस कधीच सोडणार नाही म्हणजे नाही!फ्फ त्यांच्या या ठाम विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.



गेल्या काही दिवसांत महाले-गायकवाड संघर्षाच्या पार्श्वभूमीवर बोंद्रे यांच्या भूमिकेकडे विशेष लक्ष लागले होते. मात्र, त्यांनी कोणत्याही प्रकारच्या राजकीय तडजोडीला नकार देत काँग्रेसप्रती निष्ठा पुन्हा अधोरेखित केली आहे. बोंद्रे यांच्या या आक्रमक स्पष्टीकरणामुळे ङ्कनवीन राजकीय समीकरणफ तयार होण्याच्या चर्चांना मोठा धक्का बसला असून, कार्यकर्त्यांमध्येही स्पष्ट संदेश गेला आहे. त्यांच्या भूमिकेमुळे सध्याच्या राजकीय रणधुमाळीत काँग्रेसची बाजू अधिक मजबूत झाल्याचे चित्र दिसत आहे.

## भक्तांच्या सुव्यवस्थेकरिता प्रयत्न रत गजानन महाराज संस्थान



**जनसंचलन/बुलढाणा**

सहजासहजी होळीच्या उत्सवानंतर उन्हाळ्याची चाहूल लागत असते परंतु मार्च महिन्याच्या अंतिम आणि एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासून उन्हाचा पारा हा चांगलाच तापत असतो यामध्ये विदर्भाची पंढरी येथे भाविकांची नेहमीच मांदियाळी पाहायला मिळत असते आणि गजानन महाराजांच्या दर्शनाकरता आलेल्या भक्तांना या उन्हाचा कोणताही त्रास होऊ नये याचा विशेष लक्ष देऊन गजानन महाराज संस्थान आणि तेथील सेवेकरी काळजी घेत असतात भाविकांचे सेवेकरीता संस्थान तर्फे मखमली कार्पेट अंथरून उन्हाची झड लागू नये याकरता पांढरे शुभ्र छत सुद्धा संस्थान कडून तयार करण्यात आलेली आहेत जे भाविक प्रदक्षिणा करतात त्यासाठी सुद्धा संस्थांकडून विशेष अशी सुविधा करण्यात येत असते एवढ्यावरच ही सुविधा थांबत नसून सगळं काही करून देखील कधीही आपण हे असं करतो याची अनुभूती न येता स्वतः महाराज आमच्याकडून हे सर्व करून घेतात अशी भावना येथील सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या मनामध्ये असते

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८